# विश्वकोश पेनड्राइव्हवर

## राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाचा निर्णय

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत तयार करण्यात आलेले विश्वकोशाचे खंड पेनड्राइव्हवर देण्याचा निर्णय राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यात इंटरनेटची सुविधा नसलेल्या ठिकाणी पेनड्राइव्हमार्फत विश्वकोशाचे सर्व खंड सहजरीत्या उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

मराठी भाषा दिनानिमित्त मुंबईत गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या कार्यक्रमात राज्य सरकारतर्फे सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते मराठी विश्वकोशाचे सर्व खंड असलेला पेनड्राइव्ह लाँच करण्यात आला. ग्रंथाली प्रकाशन या संस्थेमार्फत हा पेनड्राइव्ह राज्यभर वितरीत केला जाणार आहे. वाचकांसाठी पेनड्राइव्ह अल्पदरात उपलब्ध करण्यात येणार आहे. यापूर्वीही विश्वकोशाचे खंड 'सीडी'मार्फत वितरित करण्यात आले होते. तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत असल्यामुळे सीडीचा वापर सध्या फारसा केला जात नाही. त्यामुळे, विश्वकोशाची सीडी प्रकाशित करूनही त्याची फारशी विक्री झालेली नाही. त्यावर उपाय म्हणून पेनड्राइव्हचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. मराठी विश्वकोश हा महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. मात्र, अनेकदा इंटरनेटची व्यवस्था नसल्याने त्याचा फारसा वापर होत नाही. राज्याच्या ग्रामीण भागामध्ये आणि प्रामुख्याने शाळांमध्ये ही अडचण येते. यावर मात करण्यासाठी मराठी भाषा विभागाने पेनड्राइव्हचा मार्ग स्वीकारला आहे.

> **मराठी विश्वकोशाला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. या मागणीचा विचार करताना कोशाच्या २० खंडांच्या प्रती प्रकाशित करण्यासाठी बराच कालावधी लागतो. त्यामुळे, वाचकांना संपूर्ण विश्वकोश त्वरीत उपलब्ध व्हावा, यासाठी पेनड्राइव्हचा मार्ग स्वीकारला आहे.**
>
> **- दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ**



पेनड्राइव्हद्वारे विश्वकोश वितरित करण्यासाठी मराठी भाषा विभागाने ग्रंथाली प्रकाशनाबरोबर एक वर्षाचा करार केला आहे. या कराराप्रमाणे पेनड्राइव्हचे दर ठरवण्यात येणार असून ते नाममात्र असावेत, तसेच पेनड्राइव्हमध्ये वाचकांच्या दृष्टीने अद्ययावत सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पेनड्राइव्हमधील माहिती सुरक्षित असावी, ग्रंथालीने ग्राहकांना वेळोवेळी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत केलेले खंड उपलब्ध करून देण्यात यावेत, अशा सूचना मराठी भाषा विभागाने दिल्या आहेत.

विश्वकोशाच्या पेनड्राइव्हची तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या बुकगंगाचे संचालक मंदार जोगळेकर म्हणाले, 'पेनड्राइव्ह वर मराठी विश्वकोशाचे २० खंड, परिभाषा कोश, मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ देण्यात येणार आहेत. पेनड्राइव्हमध्ये देण्यात आलेल्या सुविधेमुळे विश्वकोश अपडेट करता येणार आहे. इंटरनेटच्या आधारे पेनड्राइव्ह अपडेट होऊ शकतील. विश्वकोशासंदर्भात देण्यात आलेली सगळी माहिती युनिकोड स्वरूपात आहे.'